साधक बंधूंस सप्रेम भेट

ॐ

॥ श्रीगुरुः शरणम् ॥



# गुरु-पौर्णिमा

श्री व्यास पौर्णिमा शके १८८६

॥ श्रीगुरुः शरणम् ॥

प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती यांजकडून उत्कट भक्तियोग व प. प. श्रीस्वामी लोकनाथतीर्थ महाराज यांजकडून शक्तिपातयोगाचा वारसा मिळालेले सद्गुरु योगश्रेश श्रीवामनरावजी गुळवणी महाराज अनेक मुमुक्षूंस या सद्विद्येचा लाभ देते झाले आहेत व देत आहेत. असे भक्त मानसिक शांती, सुख व समाधानाचा आनंद लुटीत आहेत.

आज गुरुपौर्णिमेनिमित्त श्रींच्या भक्तांनी विविध उपचारांनी श्रींची पूजा करून आपला आदर व्यक्त केला आहे. मीही ही पंधरा वाक्सुमने श्रींस अर्पण करून त्यात सहभागी होत आहे. ॐ तत्सत् ।

गुरुपौर्णिमा : १८८६
दादर, मुंबई १४

ना. व्यं. भागवत

॥ श्रीगुरुः शरणम् ॥

# गुरु-पौर्णिमा

श्रीशक्ति ज्याचे पदी राहि नित्य ।

अनुभूति लाभे मुमुक्षूंस सत्य ॥

तुझा पाहिजे मात्र संकल्प झाला ।

नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ॥ १ ॥

वास्तव्य जेथे श्रीभगवतीचे ।

सदोदीत जेथे मांगल्य नाचे ॥

मिळे श्रीकृपे मुक्ति सायुज्यतेला ।

नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ॥ २ ॥

मनी भाव ज्यांच्या सदा साधकांचा ।
परी पाहिजे भक्त सद्भावनेचा ॥
चिंता नुरे पावुनी श्रीकृपेला ।
नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ॥ ३ ॥

नको जावया घोर रानावनासी ।
पथीं चालवीतो धरोनी करासी ॥
करी साउली ताप वारावयाला ।
नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ॥ ४ ॥

राहे मुखीं नाम श्रीसद्गुरूंचे ।
ते जाहले धन्य जन्मोनि साचे ॥
जरी पुण्य गाठी घडे दर्शनाला ।
नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ॥ ५ ॥

वसती जिथे अष्टही सिद्धि पूर्ण ।
साशंक का ? काय राहील न्यून ॥
शिवो न चिंता भयही मनाला ।
नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ॥ ६ ॥

जी जी उदे कामना अंतरात ।
ती ती सदा शीघ्रही प्राप्त होत ।।
भक्तासि चिंतामणि प्राप्त झाला ।
नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ।। ७ ।।

गुरूरूपि संपूर्ण रंगून जाता ।
हरी वाहतो सर्व संसारचिंता ।।
नको अन्य काही पुरे भाव ज्याला ।
नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ।। ८ ।।

ळ अक्षरा स्थान काव्यात नाही ।
परी याविणे योग ना साध्य होई ॥
'ळ' दर्शवीतो इडा पिंगलेला ।
नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ॥ ९ ॥

वसे शेषशक्ती मुलाधार स्थानी ।
तिला जागवी सद्गुरू, नान्य कोणी ॥
निघे जागता भेटण्या श्रीशिवाला ।
नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ॥ १० ॥

णी वाटते दर्शवी वाणि चारी ।
परा हो प्रभावी, अविद्येस वारी ॥
जयाच्या कृपे शक्ति लाभे जिवाला ।
नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ॥ ११ ॥

महादेव श्रीशंकर आदिनाथ ।
प्रणेता जयाचा महायोग ख्यात ॥
प्रसारावया ज्या जगी योजियेला ।
नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ॥ १२ ॥

हाकेस शीघ्र प्रतिसाद, करी न कष्टी ।
भक्तासि, नित्य प्रतिपाळित कूर्मदृष्टी ।।
पूर्णांतुनी पूर्ण, स्वरूपि आला ।
नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ।। १३ ।।

राहे सदा निर्भय निर्विकार ।
घालूनि श्रींच्यावरि सर्व भार ।।
रक्षावयासी कटिबद्ध झाला ।
नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ।। १४ ।।

जगीं जन्मुनीं जाहलों धन्य धन्य ।
असा सद्गुरू लाभला पूर्वपुण्य ॥
आद्याक्षरे गुंफुनि अर्पि माला ।
नमस्कार साष्टांग श्रीवामनाला ॥ १५ ॥

गुरु-पौर्णिमा : १८८६